वर्ष : ०५ | अंक: २३ | मुंबई, मंगळवार ३० एप्रिल २०१९ ते ६ मे २०१९ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 'कोस्टल रोड' प्रकल्प रखडणार?

3 → महाराष्ट्राचा कौल निर्णायक

मुंबई-गोवा हायवेवर सावली हरपली, चौपदरीकरणासाठी हजारो झाडांची कत्तल ← 4

# चौथ्या टप्प्यात देशात ६४ टक्के तर महाराष्ट्रात ५७ टक्के मतदान

मुंबई- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातलं मतदान संध्याकाळी सहा वाजता संपलं. निवडणूक आयोगाने झालेल्या मतदानाची सरासरी टक्केवारी जाहीर केलीय. देशात ५९.२५ टक्के मतदान झालं आहे. तर महाराष्ट्रात ५१.२८ टक्के मतदान झालं आहे. ९ राज्यातील ७२ मतदारसंघांमध्ये हे मतदान पार पडलं. निवडणूक आयोगाने संध्याकाळी सहावाजेपर्यंत झालेल्या मतदानाची अधिकृत आकडेवारी जाहीर केलीय.



लोकसभेच्या चौथ्या टप्प्यात महाराष्ट्रातील १७ मतदारसंघांमध्ये आज मतदान झालं.



## मतदानाची आकडेवारी (टक्क्यांमध्ये) पुढील प्रमाणे

१. नंदुरबार - ६२.४४
२. धुळे - ५०.९७
३. दिंडोरी - ५८.२०
४. नाशिक - ५३.०९
५. पालघर - ५७.६०
६. भिवंडी - ४८.९०
७. कल्याण - ४१.६४
८. ठाणे - ४६.४२
९. मुंबई उत्तर - ५४.७२
१०. मुंबई उत्तर पश्चिम - ५०.४४
११. मुंबई ईशान्य - ५२.३०
१२. मुंबई उत्तर मध्य - ४९.४९
१३. मुंबई दक्षिण उत्तर - ५१.५३
१४. मुंबई दक्षिण - ४८.२३
१५. मावळ - ५२.७४
१६. शिरूर - ५२.४५
१७. शिर्डी - ५६.१९

## पालघरमध्ये मतदारयादीत यादीत हजारो बोगस नावं असल्याचा शिवसेना, बविआचा आरोप

**पालघर-** पालघर लोकसभेसाठी चौथ्या टप्प्यात मतदान होत आहे. या मतदारसंघात शिवसेना आणि बहुजन विकास आघाडीमध्ये मुख्य लढत होत आहे. दरम्यान मतदानाच्या आधी शिवसेना आणि बहुजन विकास आघाडीने मतदार यादीमध्ये हजारो नाव बोगस असल्याचा आरोप निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे केला आहे. बविआने ६० हजार मतदारांची नावे दुबारा आल्याचा आरोप केला आहे. तर शिवसेनेने ५६ हजार मतदारांची दोनदा नावे असल्याचा आरोप केला आहे. आश्चर्याची बाब म्हणजे एकाच महिलेचे ६८ वेळा मतदारयादीत नाव असल्याचं देखील निदर्शनास आलं आहे. शिवसेनेने पालघर लोकसभा मतदारसंघातील मतदारयादीची चिरफाड करून बोगस मतदार असल्याचं सांगितलं आहे.

उर्वरित पृष्ठ 2 वर

# मध्यमवर्ग, करदाते ही देशाची संपत्ती –नरेंद्र मोदी



मुंबई - मध्यमवर्गीयांनो, तुमची इमानदारी, पाठिंब्यामुळे मी गरिबांसाठी काही करू शकलो. लाल किल्ल्यावर म्हणालो की, जमल्यास गॅस सबसिडी सोडा आणि करोडो मध्यमवर्गीयांनी अनुदान सोडले. ती गॅसची टाकी गरीब परिवारात पोहोचली. रक्तदान, नेत्रदान, देहदान करणाऱ्या मध्यमवर्गीयांची संख्या सवाधिक आहे. ज्येष्ठ नागरिक अनुदान सोडलेल्यांची संख्या ४० लाख आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईतील जाहीर सभेत केले. ते म्हणाले, करदात्यांना आम्ही संसदेत अर्थसंकल्प मांडताना धन्यवाद दिले. मध्यमवर्ग अनेक दशकांपासून देशाची सेवा करत आहे. पण काँग्रेस म्हणते मध्यमवर्ग स्वार्थी आहे. हे शब्द असेच निघाले नाही. त्यांचे घोषणापत्र काढून बघा. त्यांनी मध्यमवर्गाबाबत चकार शब्द काढला नाही. एका घराण्यासाठी मध्यमवर्गावर कराचा बोजा टाकू पाहते आहे. काँग्रेस म्हणजे महागाई करवाढ भ्रष्टाचार हीच काँग्रेसी त्रिसूत्री आहे. मात्र मी मध्यमवर्गाचे विशेष आभार मानतो.

निवडणूक निकालांबाबत जी काही भाकिते वर्तविली जात आहेत, याचा उल्लेखही मोदी यांनी आपल्या भाषणात केला. ते म्हणाले, तुम्ही कोणताही सर्व्हे पाहा. छोट्या पडद्यावरचा निकाल पाहा. निकाल काय आहे? तर भाजप पूर्ण बहुमताचे सरकार स्थापन करणार आहे. भाजपला निवडणुकीत सर्वाधिक मते मिळणार आहेत. जे सर्व्हे करत आहेत ते महायुतीला सर्वाधिक मते मिळतील, असे म्हणत आहेत. महायुतीच्या अधिकाधिक जागा येतील, असे म्हणत आहेत. काँग्रेस विसर्जित करा, असे स्वत: महात्मा गांधी म्हणाले. ती काँग्रेस ४४ वरून ५० वर येईल की ४४ वरच अडखळेल अशीच चर्चा आहे. तिसऱ्या टप्प्यानंतर भाजप एनडीए सरकार येणार हे नक्की. मग समझदारी कशात आहे? मुंबईकर हुशार आहेत, हवेचा त्यांना अंदाज येतो. मत बरबाद करणार की योग्य ठिकाणी देणार? काँग्रेसच्या इतिहासात सर्वात कमी जागा २०१४ मध्ये मिळाल्या. आणि आता २०१९ सर्वात कमी जागांवर काँग्रेस उभी आहे.

तुमच्या मदतीने हा चौकीदार गरिबांच्या कल्याणासाठी, पायाभूत सेवांसाठी काम करू शकला. मध्यमवर्गीय आणि करदाते हे आपल्या देशाची संपत्ती आहेत. या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हेही उपस्थित होते.

## मोदी तिरंगा शाबूत ठेवतील



पाकिस्तानने एखादी आगळीक केली तर नुसते त्यांना खलिते पाठवत बसण्याऐवजी त्यांचे कंबरडे मोडले जाते हे आम्हाला दाखवून दिले आहे. त्यामुळेच आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपला पाठिंबा दिला. देशाचे तुकडे करायला काहीजण निघाले आहेत, मात्र मोदी पुन्हा पंतप्रधान होऊन त्यांना फासावर लटकवतील आणि देशाचा तिरंगा शाबूत ठेवतील, असा विश्वास शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी व्यक्त केला. वांद्रे येथील बीकेसी मैदानावरील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या शिवसेना-भाजप युतीच्या सभेत उद्धव बोलत होते. ते म्हणाले, 'मी नरेंद्र मोदी, अमित शहा यांचा निवडणूक अर्ज भरण्यासाठी गेलो होतो. आमच्या युतीच्या सर्व नेत्यांच्या महाराष्ट्रात एकत्रित सभा होत आहेत. मात्र आतापर्यंत ५६ पक्षांची आघाडी करणाऱ्या काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीच्या नेत्यांची अशी एकही एकत्रित सभा झालेले नाही.

## काँग्रेसला ५० जागाही मिळणार नाहीत, मोदींचे भाकीत

काँग्रेसला मोठ्या पराभवाला या निवडणुकीत सामोरे जावे लागणार आहे. काँग्रेसला ५० पेक्षा जास्त जागा मिळणार नाहीत, असे भाकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. तसेच पंतप्रधानपदाची स्वप्ने पाहणाऱ्या काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांच्यावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी टीका केली. मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुलातील जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्धव ठाकरेंच्या तोफा धडाडल्या. यावेळी मोदींनी विरोधकांना इशारा दिला आहे. पुन्हा पंतप्रधान झाल्यास भ्रष्टाचारी नामदारांना तुरूंगात धाडणार, असा मोदींनी सूचक इशारा दिला आहे. यावेळी मुंबईतल्या बीकेसीमध्ये झालेल्या जाहीर सभेत नरेंद्र मोदी आणि उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राहुल गांधींवर जोरदार घणाघाती हल्ला चढवला. दरम्यान, पंतप्रधानांच्या मुंबईतील सभेत उद्योगपती मुकेश अंबानी यांचे पुत्र अनंत अंबानी पहिल्या रांगेत दिसून आलेत. काँग्रेस उमेदवाराला पाठिंबा दिल्यानंतर अंबानींचा डॅमेज कंट्रोल असल्याची चर्चा सुरु झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मराठीतून भाषणाला सुरुवात केली. त्यांनी उद्धव ठाकरे छोटा भाऊ असल्याचा उल्लेख केला. वाराणसी या संस्कृतीच्या नगरीतून उमेदवारी अर्ज दाखल केला आणि समृद्ध असलेल्या मुंबईत आशीर्वाद घेण्यासाठी आलो. संस्कृती आणि सामर्थ्य ही भारताची शक्ती, असे मोदी म्हणालेत.

# बोरीवलीत दोन ठिकाणी मतदान खोळंबा, मतदार परतले

**मुंबई - मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील बोरीवली पश्चिमेकडील दोन मतदारसंघात मतदान सुरू झाल्याने मतदारांचा गोंधळ उडाला आहे. सकाळी लवकर येऊनही मतदानास सुरुवात न झाल्याने तासभर रांगेत तिष्ठत रहावं लागल्यानंतर अनेक मतदार माघारी परतले. त्यामुळे या मतदान केंद्रावर सकाळी गोंधळाचं वातावरण पाहयला मिळालं. तर डोंबिवलीतही मतदान यंत्रणेत बिघाड झाल्याने मतदान प्रक्रिया रखडली.**



मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातील बोरीवली पश्चिमेकडील गोराई वन एरिया येथील स्वामी विवेकानंद हायस्कूल बुथ क्रमांक ५० वर मतदारांनी पहाटे साडे सहा वाजल्यापासूनच रांगा लावल्या होत्या. मात्र सातनंतरही मतदान सुरू न झाल्याने मतदारांमध्ये प्रचंड गोंधळ उडाला. मतदान उशिरा सुरू होण्यामागचं कोणतंही कारण मतदारांना सांगण्यात आलं नाही किंवा मतदान किती वाजता सुरू होईल याचीही माहिती देण्यात आली नाही, त्यामुळे मतदारांनी तासभर वाट पाहून मतदान केंद्रावरून काढता पाय घेतला. हीच परिस्थिती सुविधालय शाळेतही होती. तिथेही ७ वाजल्यानंतरही मतदान सुरू न झाल्याने रांगेत तिष्ठत उभे असलेले मतदार वैतागले होते.

### *डोंबिवलीत ईव्हीएम बंद*

डोंबिवलीतही अनेक मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीन बंद पडल्याने मतदान प्रक्रिया रखडली आहे. ईव्हीएममधील बिघाडामुळे मतदान केंद्रांवर रांगा लागल्या असून मतदारांना ताटकळत उभं राहावं लागल्याने या मतदान केंद्रांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.

## डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले, शिवसेना सोडण्याचे कारण!



**राजगुरूनगर -** शिवसेनेला जय महाराष्ट्र करत राष्ट्रवादी काँग्रेसचे घड्याळ का स्वीकारले याचे कारण अभिनेता डॉ. अमोल कोल्हे यांनी अखेर उघड केले आहे. सातारा लोकसभा मतदारसंघातून उदयनराजे भोसले यांच्याविरोधात निवडणूक लढवणार का, असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावेळी छत्रपतींच्या गादीची कधीच गद्दारी करणार नाही, ही भावना मनात धरून शिवसेना सोडल्याचे सांगत यावर पहिल्यांदाच मौन सोडले आहे.

# 'पंतप्रधानपदासाठी चंद्राबाबू, ममता दीदी किंवा मायावती प्रबळ दावेदार'-शरद पवार

**नवी दिल्ली - विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजेच एनडीएला यंदाच्या लोकसभा निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळणे अतिशय कठीण आहे. त्यामुळे NDA बहुमत मिळवण्यास अपयशी ठरले, तर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती हे तीन जण मला पंतप्रधानपदाचे प्रबळ दावेदार वाटतात, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले आहे.**



नरेंद्र मोदी पंतप्रधान होण्याआधी गुजरातचे मुख्यमत्री होते. त्यांनी राज्याच्या राजकारणात केलेली कामगिरी पाहूनच त्यांच्या नेतृत्वाखालील NDA ला २०१४ मध्ये लोकांनी बहुमत दिले. असेच काहीसे एनडीएला स्पष्ट बहुमत न मिळाल्यास घडू शकते. कारण दीर्घकालीन मुख्यमंत्रिपदाचा अनुभव गाठीशी असलेले चंद्राबाबू नायडू, ममता बॅनर्जी आणि मायावती हे तीन पंतप्रधानपदासाठी योग्य पर्याय मला सध्या दिसत आहेत, असे पवार म्हणाले. काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी हे पंतप्रधानपदासाठी योग्य उमेदवार नाहीत असे मी म्हणत नाही. मायावती, ममता आणि नायडू हे मुख्यमंत्रिपदाची धुरा वाहिलेले उमेदवार आहेत. त्यामुळे पंतप्रधानपदासाठी ते देखील योग्य पर्याय ठरू शकतात, असेही पवार यांनी मुलाखतीत म्हटले आहे.

याशिवाय, आपण पंतप्रधानपदाच्या शर्यतीत नसल्याचे पवारांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले. तसेच राहुल गांधींपेक्षा या तीन उमेदवारांना प्रबळ दावेदार मानता का? या प्रश्नाचे उत्तर देताना पवार म्हणाले की मी पंतप्रधानपदाच्या शर्यतीत नाही, असे राहुल गांधींनीच अनेकदा सांगितले आहे. त्यामुळे या मुद्द्यावर कोणतीही चर्चा निरर्थक आहे.

# आता 'राजधानी'तून १४ तासांत मुंबई ते दिल्ली प्रवास शक्य

**मुंबई- पश्चिम रेल्वे मार्गावरील राजधानी एक्स्प्रेसचा वेग वाढविण्यासाठी आणि प्रवाशांचा वेळ वाचविण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासन राजधानी एक्स्प्रेसला पुश-पुल प्रकारातील इंजिन जोडणार आहे. त्यामुळे १४ तासांत मुंबई ते दिल्ली प्रवास करणे शक्य होणार असून प्रवासासाठीचा सुमारे दीड तासाचा वेळ वाचविणे शक्य होणार असल्याची माहिती पश्चिम रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.**

पश्चिम रेल्वे मार्गावरील मुंबई सेंट्रल ते दिल्लीपर्यंतचे अंतर १ हजार ३८४ किमी आहे. हे अंतर कापण्यासाठी सध्या राजधानी एक्स्प्रेसला १५ तास ५७ मिनिटे एवढा वेळ लागतो. मात्र पुश-पुल इंजीन लावल्यास सुमारे दीड तासाचा वेळ वाचविला जाणार असून सुमारे १४ तासांत प्रवास होणार आहे. राजधानी एक्स्प्रेसवर पुश-पुल इंजीन लावून चाचणी घेण्यात



येत असल्याचे पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी रवींद्र भाकर यांनी सांगितले. पश्चिम रेल्वे मार्गावरून गाडी क्रमांक १२९५१ आणि १२९५२ राजधानी एक्स्प्रेस चालविण्यात येते. ही एक जलदगती प्रवासी मेल, एक्स्प्रेस आहे. राजधानी एक्स्प्रेस देशातील दोन मोठ्या शहरांना जोडत असल्याने राजधानी एक्स्प्रेसला अनन्यसाधारण महत्त्व आहे. १९७२ साली या मार्गावरून राजधानी एक्स्प्रेस सुरू झाली आणि प्रवाशांत लोकप्रिय झाली. दरम्यान, ऐन उन्हाळ्याच्या सुट्टीकालीन वेळेत जेट एअरवेज बंद झाल्याने मुंबईकरांना दिल्लीला जाण्यासाठी इतर विमान सेवांचा वापर करावा लागत आहे.

# बेघरांसाठी रात्रनिवारा; फेरीवाल्यांचीही पथारी

**मुंबई-** पदपथावरील अनधिकृत झोपड्यांवर हातोडा चालवत पालिकेने हुसकावून लावलेले झोपडपट्टीवासी आणि त्यांच्या जोडीने भिखारी, गुंड प्रवृत्तीच्या बेघर व्यक्तींनी माहीम परिसरातील पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या शाहूनगर पादचारी पुलावरच रात्री ठाण मांडण्यास सुरुवात केली आहे. अंधार पडताच पादचाऱ्यांची तमा न बाळगता ही मंडळी पादचारी पुलावरच वळकटी पसरून निद्रिस्त होत आहेत. या प्रकारामुळे पादचारी धास्तावले आहेत. मात्र सेनापती बापट मार्गावरून शाहूनगर, धारावी आणि आसपासच्या परिसरात जाण्यासाठी हा एकमेव जवळचा मार्ग असल्यामुळे नागरिकांना नाइलाजाने या पुलावरून जावे लागत आहे. राजकारणीही हा प्रश्न सोडविण्यास असमर्थ ठरत



असल्याने लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याच्या विचारात रहिवाशी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये धारावी आणि शाहूनगर परिसरातील लोकवस्तीमध्ये वाढ होत गेली आणि नागरिकांच्या सोयीसाठी माहीम पूर्व-पश्चिम भाग जोडण्यासाठी १९७०-७१ दरम्यान हा पादचारी पूल बांधण्यात आला. या पुलामुळे धारावी आणि शाहूनगर परिसरातील रहिवाशांना माहीम पूर्व आणि पश्चिम भागात जाण्यासाठी एक पर्याय उपलब्ध झाला. मात्र माहीम स्थानक आणि पुलाच्या पायऱ्यांदरम्यानच्या पदपथावर अनधिकृत झोपड्या उभ्या राहिल्या आणि फेरीवाल्यांनही तेथेच पथाऱ्या पसरल्या. याच परिसरात छोटी-मोठी कामे करून झोपडपट्टीवासी आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवीत होते. गेली अनेक वर्षे झोपडपट्टीवासीय आणि फेरीवाल्यांच्या गर्दीतून वाट काढत रेल्वे स्थानक गाठणारे प्रवाशी कमालीचे अस्वस्थ झाले होते. याबाबत प्रवाशांनी वारंवार पालिकादरबारी तक्रारी केल्या. अखेर पालिकेने या झोपड्या हटविल्या. त्यामुळे पादचाऱ्यांसाठी पदपथ मोकळा झाला. याच परिसरात काम करणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना रात्रीच्या वेळी थेट पादचारी पुलाचाच ताबा घेण्यास सुरुवात केली. दिवसभर कामात व्यस्त असणारी ही मंडळी अंधार पडताच पुलावरच अंथरुण पसरून निद्रिस्त होऊ लागली. त्यामध्ये भिखारी, फेरीवाले यांचाही समावेश आहे. त्यामुळे या पुलाला रात्र निवाऱ्याचे स्वरूप आले आहे.

# 'न्हाणीघरां'ची घरे बनवली!

**मुंबई-** 'म्हाडा'कडून सुरू असलेल्या नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासात हात धुऊन घेत सार्वजनिक बांधकाम विभागातील नऊ अधिकाऱ्यांनी चक्क या चाळीत असलेली 'न्हाणीघरे' अर्थात सार्वजनिक मोरी आपल्या नावावर करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यामुळे ही 'न्हाणीघरे'ही आता या योजनेत 'लाभार्थी' ठरली आहेत. म्हाडाने या बाबीची गंभीर दखल घेतली असून कारवाई करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला कळविले आहे. 'म्हाडा'कडून नायगावसह ना. म. जोशी मार्ग, वरळी बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया सुरू आहे. म्हाडाकडून 'बीडीडी'वासीयांना प्रत्येक घरामागे ५०० चौरस फुटांचे घर मिळणार आहे. नायगाव येथील पात्रता यादी सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केली आहे. या यादीत चाळीतील नऊ न्हाणीघरांच्या जागी खोल्या दाखवून त्यांचे भाडेकरू म्हणून नोंद असल्यामुळे रहिवासीही अवाक् झाले. या खोल्यांच्या नावे विजेचे मीटर, भाडेपावत्या असल्याची बाबही उघड झाली आहे. नायगाव बीडीडी चाळ रहिवाशी संघटनेने या बाबत म्हाडाकडे रीतसर तक्रार केली. या चाळीत सामाईक न्हाणीघरे होती. परंतु त्यांचा वापर होत नव्हता.



# मुंबईतील बालमृत्यू नियंत्रणात आणण्यात यश

**मुंबई-** उपनगरीय रुग्णालयांमध्ये विशेष वैद्यकीय सल्लागारांच्या नियुक्ती, रुग्णालयात होणाऱ्या प्रसूती आणि नवजात बालकांसाठीचे कृत्रिम श्वसनयंत्रणांची वाढलेली संख्या यामुळे गेल्या तीन वर्षांच्या प्रयत्नानंतर अखेर पालिकेला एक वर्षांखालील बालकांचा मृत्युदर (आयएमआर) आणि नवजात बालकांचा मृत्यू कमी करण्यात यश आले आहे. २०१८ मध्ये मुंबईमधील बालकांचा मृत्युदर २५ झाला असून गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत एकने खाली आहे, तर गतवर्षांच्या तुलनेत नवजात बालकांच्या मृत्यूमध्ये १२ टक्क्यांनी घट झाली आहे.

मुंबई शहरामध्ये तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध असूनही जन्माला आल्यानंतर एक वर्षाच्या आत मृत्यू होणाऱ्या बालकांची संख्या लक्षणीय आहे. २०१४ साली मुंबईत एक वर्षांखालील ४८८३ बालकांच्या मृत्यूची नोंद असून त्या वेळी मृत्युदर २८ होता.



बालकांचा मृत्युदर दर एक हजार बालकांमागे मोजला जातो. हा दर २०१५ मध्ये तो २६ पर्यंत खाली आला. त्यानंतरची दोन वर्षे तो स्थिर होता, तर २०१८ मध्ये तो एकने घटून २५ वर पोहोचला, असे पालिकेच्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. उपनगरांतील रुग्णालयांमध्ये गेल्या दोन वर्षांमध्ये विशेष वैद्यकीय सल्लागारांची नियुक्ती केली आहे. बालरोग विभागामध्येही या सल्लागार उपलब्ध असल्याने बालकांची प्रकृती गंभीर असल्यास तात्काळ सेवा दिली जाते. यामुळेदेखील बालमृत्युदर कमी होण्यामध्ये मदत झाली असल्याची माहिती शीव रुग्णालयाच्या नवजात बालरोग विभागाच्या प्रमुख डॉ. जयश्री मोंडकर यांनी दिली. गेल्या पाच वर्षांमध्ये म्हणजेच २०१४ पासून एक वर्षांखालील बालकांच्या मृत्यूमध्ये १८ टक्क्यांची घट झाली आहे, तर जन्मल्यापासून २८ दिवसांपर्यंतच्या नवजात बालकांच्या मृत्यूच्या संख्येतही २५ टक्क्यांची घट झाली आहे.

# बलात्कार आणि हत्याप्रकरणी तीन वर्षांनंतर पुन्हा खटला

**मुंबई-** अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्यानंतर तिच्यावर बलात्कार करून तिची हत्या केल्याप्रकरणी ठाणे सत्र न्यायालयाने अतुल लोटे या आरोपीला सुनावलेली फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाने गुरूवारी तीन वर्षांनंतर रद्द केली. मात्र बलात्कार आणि हत्येच्या आरोपातून लोटे याची सुटका करण्यास नकार देत हे प्रकरण पुन्हा ठाणे सत्र न्यायालयाकडे वर्ग केले.

प्रक्रियेत त्रुटी राहिल्याच्या कारणास्तव न्या. भूषण धर्माधिकारी आणि न्या. प्रकाश नाईक यांच्या खंडपीठाने ही शिक्षा रद्द केली. एवढेच नव्हे, तर खटल्याच्या सुनावणीदरम्यान झालेल्या चुका दूर करण्यासाठी पुराव्यांची पुनर्पडताळणी करून नव्याने खटला चालवायचा वा नव्याने आरोप निश्चित करायचे हे ठरवावे, असे आदेशही ठाणे न्यायालयाला दिले. सात वर्षांच्या मुलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केल्यानंतर तिची निर्घृण हत्या केल्याचा आरोप लोटे याच्यावर



होता. मात्र ठाणे न्यायालयाने शिक्षा सुनावण्याच्या दोन दिवस आधीच, बलात्काराच्या आरोपाऐवजी नव्या कठोर कलमांनुसार त्याला बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पोक्सो) दोषी ठरवत २८ सप्टेंबर २०१६ रोजी फाशीची शिक्षा सुनावली होती.

# आठवडाभरात ५०० गावांतील जलस्रोत कोरडे!

**मुंबई- राज्यात उन्हाचा पारा वाढत असताना त्याचा परिणाम जलस्रोतांवर होत असून एका आठवड्यात ५०० गावातील जलस्रोत कोरडे पडले आहेत. त्यामुळे टँकरने पाणीपुरवठा कराव्या लागणाऱ्या गावांची संख्या आता ११ हजार ७३८ वर पोहोचली आहे. अनेक जिल्ह्यांत जनावरांच्या चारा-पाण्याची समस्याही गंभीर असून दुष्काळग्रस्त नऊ जिल्ह्यांत १०८४ छावण्यांमध्ये सात लाख १४ हजार जनावारांना सांभाळले जात आहे.**

उन्हाळ्याचा दाह वाढू लागल्यापासून अनेक गावातील जलस्रोत संपू लागले आहेत. त्यामुळे गाव- पाड्यातील लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. आजमितीस तीन हजार ५५५ गावे आणि आठ हजार १८३ पाड्यांमध्ये चार हजार ५९४ टँकर मार्फत पाणीपुरवठा केला केला जात आहे. मराठवाड्यातील अडीच हजार नाशिक विभागातील एक हजारहून



अधिक गावात टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. भूजल पातळी खाली गेल्याने तसेच जलस्रोत कोरडे पडू लागल्याने विहिरी आणि बोरवेलमधूनही पाणी मिळणे मुष्कील होत असल्याने टँकरच्या मागणीत सातत्याने वाढ होत असून गेल्या आठवडाभरात तब्बल ५०० गाव-पाड्यांमध्ये पाणी टंचाई जाणवू लागल्याने तेथे टँकरने पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्याचे मदत आणि पुनर्वसन विभागातील सूत्रांनी सांगतले. टँकर्सप्रमाणेच जनावरांच्या छावण्यांच्या मागणीतही दिवसेंदिवस वाढ होत आहे. आतापर्यंत अहमदनगर, सातारा, सांगली, सोलापूर, औरंगाबाद, परभणी, बीड, उस्मानाबाद, जालना या नऊ जिल्ह्यात १०८४ छावण्या सुरू झाल्या असून तेथे सात लाख १४ हजार ६३७ जनावारे ठेवण्यात आली आहेत. मराठवाड्यात सर्वाधिक दुष्काळ असून तेथे ६६४ छावण्या सुरू असून एकट्या बीड जिल्ह्यात ५९० छावण्या सुरू असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

# 'कोस्टल रोड' प्रकल्प रखडणार?




**मुंबई- सागरी किनारा मार्ग (कोस्टल रोड) प्रकल्पासाठी समुद्रात टाकण्यात येणाऱ्या भरावाच्या कामासह इतर कामांस दिलेली स्थगिती उठवण्यास उच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट शब्दांत नकार दिला. एवढेच नव्हे, तर प्रकरणाची सुनावणी ३ जून रोजी ठेवल्याने ४० दिवसांहून अधिक काळ सागरी किनारा मार्गाचे काम रखडणार आहे. त्यामुळे पालिकेने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याची तयारी सुरू केली आहे.**

प्रकल्पासाठी समुद्रात भराव टाकण्याचे काम तूर्त करू नये, असे बजावूनही ते सुरूच ठेवल्याबाबत नाराजी व्यक्त करत प्रकल्पाकरिता समुद्रात टाकण्यात येणाऱ्या भरावाच्या कामासह सागरी किनारा मार्गाचे बांधकाम थांबवावे आणि परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. या प्रकल्पाच्या कामामुळे सागरी किनाऱ्यालगत झालेले पर्यावरणीय नुकसान झाले तेवढे पुरे झाले. यापुढे ते केले जाऊ नये, याचा पुनरुच्चारही न्यायालयाने स्थगितीचे आदेश देताना केला होता. मंगळवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी आतापर्यंत जो भराव टाकलेला आहे तो वाचवण्यासाठी बंधारे बांधण्याची गरज आहे; परंतु न्यायालयाने ते काम करण्यासही मज्जाव केला आहे. त्यामुळे या भरावाचे संरक्षण कसे करायचे, हा प्रश्न आमच्यासमोर आहे. त्याचे संरक्षण केले नाही, तर विशेषत: पावसाळ्यात हा भराव वाहून जाईल आणि आतापर्यंत केलेल्या प्रकल्पाच्या कामावर पाणी फेरले जाईल, असा दावा करत भराव टाकण्याच्या कामाला दिलेली स्थगिती उठवण्याची मागणी पालिकेच्या वतीने ॲड. श्रीहरी अणे यांनी केली.

मात्र मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंदराजोग आणि न्यायमूर्ती नितीन जामदार यांच्या खंडपीठाने पालिकेची ही मागणी मान्य करण्यास नकार दिला. त्याच वेळी सागरी किनारा आणि सागरी जैवविधितता यांना यापुढे धोका पोहोचणार नाही यासाठी पालिकेने या प्रकरणी न्यायालयीन अधिकारी नेमण्याची तसेच त्याच्या साथीने भराव टाकण्याच्या कामाचे चित्रीकरण करण्याची तयारी दाखवली तर पालिकेला थोडाफार दिलासा मिळण्याची शक्यता आहे, असे म्हटले; परंतु पालिकेने असा अर्ज करण्यास स्पष्ट नकार दिला.

# २६ टक्के मुंबईकरांना उच्च रक्तदाब



## २५ टक्के रुग्णांना मधुमेह असल्याचे समोर

**मुंबई-** गेल्या काही वर्षांत मुंबईकरांची जीवनशैली बदलली आहे. या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम मुंबईकरांच्या आरोग्यावर झालेला दिसून येत आहे. मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे नुकत्याच झालेल्या वैद्यकीय शिबिरांतून २६ टक्के मुंबईकरांना उच्च रक्तदाबाचा त्रास तर २५ टक्के रुग्णांना मधुमेह असल्याचे समोर आले आहे. रुग्णांमधील रक्तदाबाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. रक्तदाब वाढत असला तरीही ही व्याधी असल्याची पुसटशी कल्पनाही अनेक रुग्णांना नसल्याची धक्कादायक माहिती या शिबिरांमधून समोर आली आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाने माहिम, मालाड आणि चेंबूर-गोवंडी या परिसरात गेल्या काही महिन्यांत वैद्यकीय शिबिरे घेतली. या परिसरातील झोपडपट्ट्या आणि बैठ्या वस्त्यांमधील स्थानिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न वैद्यकीय शिबिरांतून करण्यात आला. तिन्ही वैद्यकीय शिबिरांतून ५९०हून अधिक रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरांत सहभागी रुग्ण ४० ते ५० या वयोगटांतील असल्याची माहिती मुंबई पालिकेच्या आरोग्य विभागाचे संयुक्त कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. संतोष रेवणकर यांनी दिली. या वैद्यकीय शिबिरांमध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोगाच्या तपासण्या करण्यात आल्या. मात्र अद्याप कर्करोगाचे वैद्यकीय अहवाल प्रलंबित असल्याचे डॉ. रेवणकर यांनी सांगितले. रक्तदाब विशिष्ट जीवनशैलीमुळे निर्माण झालेला आजार आहे. गेल्या काही वर्षांत त्याचे प्रमाण वाढले आहे.

# भारतात २०१९ मध्ये मालमत्ता निर्मित्ती अन् संवर्धनाला मदत

**मुंबई-** नाईट फ्रँकने आयोजित केलेल्या दृष्टीकोन सर्वेक्षणानुसार, चालू आर्थिक वर्षात म्हणजे २०१९ या वर्षी भारतातील राजकीय व आर्थिक परिस्थितींमुळे मालमत्ता निर्मिती आणि संवर्धनाला मदत होणार आहे. याबाबत देशातील २८ टक्के भारतीयांनी आपले सकारात्मक मत व्यक्त केले. हा आकडा जागतिक रेंजच्या म्हणजेच १२ टक्क्यांच्या जवळपास दुप्पट झाला आहे. दुसरीकडे, भारतात २०१९ सालाच्या सुरूवातीलाच निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे संपत्ती जमा करणे कठीण जाऊ शकते, असे मत ३६ टक्के लोकांनी व्यक्त केले. हा आकडा जागतिक सर्वेक्षणात बराच मोठा म्हणजे ६८ टक्के आहे.



जागतिक बाजारपेठेतील सर्वेक्षणात सहभागी झालेल्या ६२ टक्के लोकांच्या तुलनेत भारतातील ५६ टक्के लोकांनी मात्र असे मत व्यक्त केले आहे की, भारतात सध्या संपत्ती निर्माण करणे हितावह नाही. गेल्या वर्षी झालेल्या विकासाचा आढावा घेताना, २०१८ साली संपत्ती मिळवणे व तिचे जतन करणे कठीण होते वा सोपे, याचा आढावाही या सर्वेक्षणातून घेण्यात आला. जगभरातील ७० टक्के लोकांनी सर्वेक्षणात असे म्हटले की, त्यांच्या देशातील राजकारणातील आर्थिक आणि राजकीय वातावरणामुळे २०१७ च्या तुलनेत २०१८ मध्ये त्यांना संपत्ती निर्माण करणे आणि तिचे संरक्षण करणे कठीण झाले. जवळ-जवळ त्याच टक्केवारीच्या लोकांनी २०१९ साली याच भावना व्यक्त केल्या. नाईट फ्रँकने राजकीय आणि आर्थिक वातावरणाचा लोकांच्या संपत्ती व्यवस्थापनावर होणारा प्रभाव अभ्यासण्यासाठी सर्वेक्षण केले.

गेल्या दशकात जागतिक बँकांच्या हस्तक्षेपाची अभूतपूर्व पातळी पाहिली गेली आहे. कारण, अनेक देशांनी जागतिक आर्थिक संकटाच्या परिणामास आव्हान देण्याचा प्रयत्न केला आहे. येत्या काळात, आणखी एक जागतिक मंदी उद्भवू शकते, असा अंदाज असून यूएस, यूके, युरोप आणि जपानमधील मालमत्ता खरेदी यामुळे तेजीत आहे.

पृष्ठ १ वरुन

## पालघरमध्ये मतदारयादीत यादीत हजारो बोगस...

या यादीत ५६ हजार मतदारांची दोन वेळा तर इतर हजारो मतदारांची तीन, चार, पाच वेळा नावे आली आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे सुरेखा सुरेश पाटील या महिलेचे तब्बल ६८ वेळा नाव मतदार यादीत आले आहे. ही गंभीर बाब शिवसेनेने निवडणूक यंत्रणेच्या निदर्शनास पुराव्यासह आणून दिली असून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

पालघर लोकसभा मतदारसंघातील बोईसर नालासोपारा, वसई, पालघर नगर परिषद हद्दीतील २८२ आणि २८३ ही मतदान केंद्रांसह मतदारसंघात हजारो बोगस मतदारांची नावे सामाविष्ट करण्यात आली असल्याची तक्रार बहुजन विकास आघाडीचे उमेदवार बळीराम जाधव यांनी निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत नारनवरे यांच्याकडे केली. संशयीत मतदान केंद्रावर अतिरिक्त अधिकाऱ्यांची नेमणूक तसेच विशेष लक्ष ठेवून, वेब कास्टिंगद्वारे या मतदान केंद्रावर लक्ष ठेवण्याचे आश्वासन निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले आहे.

पालघर लोकसभा मतदारसंघात बविआचे बळीराम जाधव आणि महायुतीचे राजेंद्र गावित यांच्यात प्रमुख लढत आहे. या निवडणुकीत आजी-माजी खासदार एकमेकांविरुद्ध लढत आहेत. पालघर लोकसभा मतदारसंघात तीन आमदार बविआचे तर दोन भाजप आणि शिवसेना एक असे बलाबल आहे. तर वसई -विरार महानगरपालिकेत बहुजन विकास आघाडीचे वर्चस्व आहे.

# 'बुलेट ट्रेन'साठी कांदळवनांचा बळी?

**मुंबई-** अहमदाबाद-मुंबई या महत्त्वाकांक्षी बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी ठाणे, नवी मुंबई आणि पालघर येथील १९ हेक्टरवर पसरलेली कांदळवने तोडण्यास केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने परवानगी दिल्याची माहिती सोमवारी उच्च न्यायालयात देण्यात आली. असे असले तरी एवढ्या मोठ्या कांदळवनांच्या भवितव्याचा प्रश्न उच्च न्यायालयाच्या निर्णयावरच अवलंबून आहे. कांदळवने तोडण्यास बंदी आहे, मात्र विकासकामांसाठी ती तोडायची असल्यास न्यायालयाची परवानगी बंधनकारक आहे. त्यामुळेच न्यायालयाच्या निर्णयावर कांदळवने तोडली जाणार की नाहीत हे ठरणार आहे. प्रकल्पासाठी १९ हेक्टरवर पसरलेली कांदळवने तोडावी लागणार असून त्यासाठी परवानगी देण्याची विनंती 'नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन'ने (एनएचएसआरसीएल) महाराष्ट्र स्टेट कोस्टल झोन अथॉरिटी (एमसीझेडएमए) कडे केली होती. परंतु 'एनएचएसआरसीएल'ची ही विनंती 'एमसीझेडएमए'ने २२



डिसेंबरला फेटाळून लावली. त्याविरोधात 'एनएचएसआरसीएल'ने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. तसेच कांदळवने तोडण्यास परवानगी देण्याचे आदेश 'एमसीझेडएमए'ला द्यावेत, अशी मागणी केली होती. न्यायालयाने याप्रकरणी 'एमसीझेडएमए'ला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले होते. त्यावर आपली भूमिका स्पष्ट करताना 'एनएचएसआरसीएल'चा प्रस्ताव मान्य करण्यात आल्याचे 'एमसीझेडएमए'तर्फे ॲड्. शर्मिला देशमुख यांनी न्यायालयाला सांगितले होते. त्याच वेळी हा प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाकडे पाठवण्यात आल्याची माहितीही दिली होती. न्या. भूषण गवई आणि न्या. डी. एस. नायडू यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी 'एनएचएसआरसीएल'च्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आल्याचे केंद्रीय पर्यावरण मंत्रालयातर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

## संपादकीय...

# महाराष्ट्राचा कौल निर्णायक



संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात महाष्ट्रातील १७ मतदारसंघात आज मतदान होत आहे. मुंबईतील सहाही मतदारसंघांसह ठाणे, कल्याण, पालघर, भिवंडी, नाशिक, नंदुरबार, धुळे, दिंडोरी, मावळ, शिरूर आणि शिर्डी असे हे मतदारसंघ आहेत. तीन कोटी ११ लाख ९२ हजार ८२३ मतदार इथे मतदानाचा हक्क बजावतील. संपूर्ण राज्यभरात उन्हाचा प्रचंड तडाखा असूनही याआधीच्या तीन टप्प्यांमध्ये मतदारांनी उत्साहाने सहभागी होऊन लोकशाहीच्या उत्सवातील आपली भागीदारी नोंदवली. पुण्यामध्ये तुलनेने कमी मतदान झाल्यामुळे सोशल मीडियावरून पुणेकरांचा समाचार घेण्यात आला. या पार्श्वभूमीवर शनिवार, रविवारच्या सलग सुट्ट्यांपाठोपाठ मतदानाचा दिवस असल्यामुळे मुंबईच्या टक्केवारीकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. चौथ्या टप्प्यात मतदान होणाऱ्या मतदारसंघांचे वैशिष्ट्य म्हणजे हे सतराही मतदारसंघ सध्या भाजप-शिवसेना युतीकडे आहेत. इथे एकाही मतदारसंघात काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचा खासदार नाही. त्यामुळे युतीला



यापैकी किती मतदारसंघ राखता येतात किंवा आघाडी यापैकी किती ताब्यात घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे. देशाच्या राजकारणाचा विचार केला तर उत्तर प्रदेशापाठोपाठ खासदारांची सर्वाधिक संख्या महाराष्ट्रात आहे आणि २०१४च्या निवडणुकीत ४८ पैकी ४२ जागा युतीसह मित्रपक्षांनी जिंकल्या. केंद्रात भाजपसह एनडीएला बळ देण्यामध्ये महाराष्ट्राने महत्त्वाची भूमिका बजावली, त्यामुळेच एकट्या भाजपने बहुमताचा आकडा गाठला होता. मोदी लाटेमुळे हा चमत्कार घडला होता. मोदींच्या नेतृत्वाखालील भाजपकडून सरकारला अनेक अडचणीचे प्रश्न विचारले जात होते आणि त्यावर यूपीए सरकारमधील नेत्यांची फजिती होत होती. यावेळी परिस्थिती बदलली असून काँग्रेससह विरोधक प्रश्न विचारणाऱ्यांच्या भूमिकेत आहेत. मोदी यांनी २०१४च्या निवडणूक प्रचारात दिलेल्या आश्वासनांच्या अनुषंगाने अनेकांनी अनेक प्रश्न विचारले, परंतु त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून सत्ताधाऱ्यांनी राष्ट्रवादाचा राग आळवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेसचे अध्यक्ष राहुल गांधी यांच्या सभांनी दिल्लीच्या राजकारणातील महाराष्ट्राचे महत्त्व अधोरेखित केले. जवळपास ऐंशीच्या घरात पोहोचलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रचारासाठी संपूर्ण महाराष्ट्र पालथा घालून यावेळची निवडणूक अधिक महत्त्वाची असल्याचे संकेत दिले. निवडणुकीच्या रणांगणात आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडत असतात, तशा त्या यावेळीही झडल्या.

राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील अनेक नेत्यांच्या सभा, रोड शो, पदयात्रा, पत्रकार परिषदा यांनी वातावरण ढवळून निघाले. तरीसुद्धा सर्वाधिक चर्चा झाली, ती राज ठाकरे यांच्या सभांची. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एकही उमेदवार रिंगणात नसताना राज ठाकरे यांनी राज्याच्या विविध भागांत सभा घेऊन भाजपविरोधात आक्रमक प्रचार केला. सभांना दृकश्राव्य जोड देऊन प्रचार सभांचे एक नवे मॉडेल त्यांनी समोर आणले. 'लाव रे तो व्हिडिओ' हा यंदाच्या प्रचारातील सर्वाधिक लोकप्रिय उद्गार बनवला. भाजपने मुंबईत 'बघाच तो व्हिडिओ' हा तसाच कार्यक्रम बंद सभागृहात करून राज ठाकरे यांना उत्तर देण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील एकूण प्रचारावर शेवटी राज ठाकरे यांचाच प्रभाव राहिल्याचे चित्र दिसते. राज यांचा प्रत्यक्षात मतदारांवर नेमका कितपत प्रभाव पडला, हे कळण्यासाठी आणखी बराच अवधी आहे. राज्याच्या विधानसभा निवडणुकीची गणिते खऱ्या अर्थाने त्यानंतरच आकाराला येऊ लागतील. लोकसभा निवडणुकीचे निकाल, नवे सरकार स्थापन होण्याच्या राजकीय हालचाली आणि नव्या पंतप्रधानांचा शपथविधी हे सगळे पार पडल्यानंतर लगेच महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागतील. पुढची गणिते बऱ्याच अंशी केंद्रातील सरकारवर अवलंबून असणार, हे खरे असले तरी मनसेसारख्या पक्षाने विधानसभा निवडणुकीची तयारी म्हणूनच या निवडणुकीचा वापर केला आहे. पाच वर्षे आदळआपट करणारी शिवसेना भाजपच्या सोबत गेल्यामुळे आक्रमक विरोधकाची जागा राज ठाकरे यांनी घेतली आणि पुढचे सहा महिने तेच राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहतील, असे दिसते. निवडणुकीच्या आधीपासून पक्षबदलाचे वारे वाहात होते आणि त्याची चर्चा बरीच झाली. घराणेशाहीला विरोध करणाऱ्या भाजपने मोहिते-पाटील आणि विखे-पाटील या घराण्यांच्या वारसांना प्रवेश देऊन आपले राजकीय घराणे मजबूत करण्याचा प्रयत्न केला. वंचित बहुजन आघाडीने अकोला, सोलापूर, औरंगाबाद, सांगली या लढती रंगतदार बनवल्या. सुरुवातीच्या टप्प्यात एकतर्फी वाटणाऱ्या अनेक जागा प्रचाराला वेग आल्यावर अटीतटीच्या बनल्या. चार-पाच मतदारसंघ वगळता सगळीकडील लढती अटीतटीच्या बनल्या आहेत. केंद्रातील सरकारस्थापनेत यावेळीही महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावेल, हे नक्की. परंतु ती कुणाच्या बाजूने बजावतोय, हे पाहणे कुतूहलाचे ठरेल.

# श्रीलंकेतील स्फोट ही भारतासाठी भयघंटा!



**श्रीलंकेत गेल्या आठवड्यात झालेल्या भीषण बॉम्बस्फोट मालिकेकडे केवळ एक दहशतवादी घटना म्हणून पाहून चालणार नाही, तर जगाच्या या भागातही दहशतवाद पसरल्याचे ते एक लक्षण आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. खास करून 'इस्लामिक स्टेट' (इसिस) या महाभयंकर, निष्ठूर दहशतवादी संघटनेने याची जबाबदारी घेतल्याने ही दृष्टी ठेवणे आणखीनच गरजेचे ठरते. श्रीलंकेत 'इस्लामिक स्टेट' पोहोचलेलीच नाही, मग ती हे स्फोट कसे करणार? असे वाटले होते, परंतु आता वास्तविकता समोर आली आहे. शनिवारी श्रीलंकेच्या सुरक्षा दलांनी केलेल्या कारवाईत या संघटनेचे १५ दहशतवादी मारले गेले व त्यांच्या कित्येक डझन सदस्यांना अटक केली गेली. 'इस्लामिक स्टेट'चे १४० हून जास्त दहशतवादी श्रीलंकेत लपलेले असावेत, असा अधिकाऱ्यांना संशय आहे. हे खरे असेल, तर तो घोर चिंतेचा विषय आहे.**

भारतही 'इस्लामिक स्टेट'च्या रडारवर आहे, यात कोणतीही शंका बाळगण्याचे कारण नाही. जुलै, २०१४ ते जुलै, २०१६ या कालावधीत 'इस्लामिक स्टेट'ने रक्का येथून 'दबिक' नावाचे एक नियतकालिक प्रसिद्ध केले होते. त्याच्या सुरुवातीच्या अंकातच 'इस्लामिक स्टेट'ने आपल्या बंगाल प्रांताची घोषणा केली होती व त्यासाठी एका खलिफाच्या नियुक्तीचीही घोषणा केली होती. त्यांच्या या बंगाल प्रांतात भारत, पाकिस्तान, श्रीलंका, भूतान, नेपाळ, म्यानमार, थायलंडसह अनेक देशांचा समावेश होता. त्यानंतर, त्यांनी आपला एक जाहीरनामाही प्रसिद्ध केला. त्यात भारतात जिहाद छेडण्याचा स्पष्ट उल्लेख होता. त्या जाहीरनाम्यास 'ब्लॅक फ्लॅग ऑफ आयएस' असे म्हटले गेले होते. त्यावरून या राक्षसी संघटनेची नजर भारतावरही आहे, हे अगदी स्पष्ट होते.

काश्मीरच्या काही भागांत 'इस्लामिक स्टेट'चे झेंडे फडकवले गेले व समाजमाध्यमांचा वापर करून ही संघटना युवकांना आकर्षित करण्याचे प्रयत्न करीत आहे. गुप्तहेर संघटना यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. 'इस्लामिक स्टेट'ला यात फारसे यश आले नाही. युरोपमध्ये हजारो लोकांची त्यांनी भरती केली, पण भारतात मात्र जेमतेम दोन डझन युवक त्यांच्या गळास लागले. खरं तर भारतातील मुस्लीम समाज याबाबतीत खूपच सतर्क आहे. 'इस्लामिक स्टेट'चा इस्लामशी सुतरामही संबंध नाही, हे भारतीय मुस्लीम जाणून आहेत. जगात सर्वाधिक मुस्लिमांना याच संघटनेने ठार केले आहे. भारतातील एक हजाराहून अधिक इमाम व मौलवींनी 'इस्लामिक स्टेट'च्या विरोधात फतवा जारी केलेला आहे, तरीही खूप सावध राहण्याची गरज आहे.

'इस्लामिक स्टेट'चा धोका लक्षात घेत, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित दोभाल यांनी पाकव्याप्त काश्मीरसंबंधीची रणनीती बदलण्याची गरज प्रतिपादित केली होती. 'इस्लामिक स्टेट'चे दहशतवादी भारतात घुसू शकतील, असा संभाव्य मार्ग हाच आहे. अजून तरी पाकिस्तान 'इस्लामिक स्टेट'ला मदत करत नाही, पण ही संघटना पाकिस्तानात आधीच पोहोचलेली आहे. अफगाणिस्तानात तर घट्ट पाय रोवले आहेत. श्रीलंकेतही त्यांचे बस्तान पोहोचले, तर समुद्रामार्गे त्यांची दक्षिण भारतात पोहोचण्याची एक नवी डोकेदुखी निर्माण होईल.

सन २०१६मध्ये 'इस्लामिक स्टेट'शी संबंध असल्याच्या संशयावरून केरळमध्ये सहा जणांना अटक झाली होती. त्यावेळी केरळमधून २१ युवक गायब झाले होते व राष्ट्रीय तपासी यंत्रणा (एनआयए) त्या प्रकरणी तपास करत होती. त्या तपासातून असे समोर आले की, साजीर मंगलाचारी अब्दुल्ला नावाचा इसम तरुणांचे ब्रेन वॉशिंग करून त्यांना 'इस्लामिक स्टेट'साठी काम करण्यासाठी चिथावत होता. अब्दुल्ला मूळचा केरळचा आहे, पण सध्या त्याचे वास्तव्य अफगाणिस्तानच्या नंगरहार प्रांतात आहे. या प्रांतात 'इस्लामिक स्टेट'चे प्राबल्य आहे.

केरळमधून गायब झालेल्या २१ तरुणांना तेथे नेऊन प्रशिक्षण दिले गेले. त्यानंतर, हे तरुण नेमके कुठे गेले, हे स्पष्ट नाही. 'इस्लामिक स्टेट'चे हातपाय भारतात पसरू नयेत, यासाठी केरळखेरीज तेलंगण, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र, प. बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश आणि खास करून काश्मीरवर गुप्तचर संस्थांची करडी नजर आहे. अगदी उच्चशिक्षित कुटुंबातील तरुणांचीही डोकी त्यांच्या ब्रेन वॉशिंगने भडकतात. केरळमध्ये त्यांच्या जाळ्यात अडकलेल्या तरुणांपैकी कोणी संशोधक होता, कोणी ग्राफिक डिझायनर तर कोणी चार्टर्ड अकाउंटंट! 'इस्लामिक स्टेट'ची वेबसाइट नियमित पाहणाऱ्यांमध्ये काश्मीरचा पहिला, उत्तर प्रदेशचा दुसरा व महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो, अशीही माहिती समोर आली आहे.

ही परिस्थिती कशी हाताळायची व 'इस्लामिक स्टेट'च्या धोक्यापासून कसे दूर राहायचे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. यासाठी मुस्लीम युवकांमध्ये विश्वासाचे वातावरण तयार करणे व 'इस्लामिक स्टेट'सारखी संघटना मुसलमानांची कैवारी नाही तर त्यांची वैरी आहे, हे त्यांच्या मनावर पक्के बिंबविणे हाच त्यासाठी एकमेव मार्ग आहे. इस्लामिक स्टेटने इराक उद्ध्वस्त केला, सीरिया उजाड केला. त्यांनी जेथे कुठे पाय रोवले, तेथे लोकांचे जीवन नरकयातनांचे झाले. 'इस्लामिक स्टेट'पासून सर्वांनीच सावध राहण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्या गुप्तचर संस्थांनी आक्रमक पवित्रा घ्यावा लागेल.

# हंडाभर पाण्यासाठी विंचू, सापांच्या दहशतीत रात्र

**ठाणे - विहिरींनी तळ गाठलेला.. नैसर्गिक झऱ्यांमुळे विहिरीच्या भिंतीतून काय तो ओलावा पाझरत आहे.. त्यातून डबक्यात जमा होणाऱ्या पाण्यावरच सारी मदार.. त्यामुळे डब्याला दोरी बांधून त्यातून पाणी काढण्यासाठी विहिरीच्या बांधावर, लगतच्या शेतावर साप, विंचूंच्या दहशतीत संपूर्ण रात्र काढणाऱ्या महिला.. मुंबईच्या वेशीवरील शहापूर तालुक्यातील आदिवासी पाड्यांवरील हे भीषण चित्र दुष्काळाची दाहकता दर्शवते.**

ठाणे जिल्ह्यतील शहापूर तालुक्यातील अनेक आदिवासी पाडे वर्षांनुवर्षे पाणीटंचाईचा सामना करत आहेत. ठाण्याला पाणीपुरवठा करणारी अनेक धरणे या भागात असली तरी येथील गाव-पाडे तहानलेलेच आहेत. गेल्या काही वर्षांपेक्षा यंदा दुष्काळाची दाहकता अधिक आहे, असे ग्रामस्थ सांगतात. शहापुरातील सावर गावातील विहिरी



जानेवारीपासूनच कोरड्या पडू लागल्या. त्यातील एका विहिरीच्या तळातील डबक्यात साचलेले पाणी मिळवण्यासाठी लांबलचक रांगा लागतात. डब्याला दोरी बांधून पाणी काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. कसूबाई आडाम ही महिला पहाटे चार वाजता रांगेत उभी राहिली. दुपारी १२ वाजता तिला पाणी उपसण्याची संधी मिळाली. कसूबाईसारख्या अनेक महिला हंडाभर पाण्यासाठी रात्रभर जागतात. पाणीटंचाई दूर करण्यासाठी दोन दिवसाआड टँकरने पाणी विहिरीत सोडले जात होते. मात्र, गेले काही दिवस येथे टँकर फिरकलेच नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला.

शहापुरातीलच वाशाळा भागातील चिंध्याची वाडी या आदिवासी पाड्यावर तर त्याहून भीषण स्थिती आहे. सावर गावाप्रमाणेच विहिरीने तळ गाठला आहे. नैसर्गिक झऱ्यांमुळे विहिरीच्या कपारीतून झिरपणारे पाणी डबक्यांमध्ये साचते. हंडाभर पाण्यासाठी सुमारे २० मिनिटे लागतात. पाणी उपसण्याचा क्रमांक येईपर्यंत वाट पाहण्यासाठी अनेक महिलांना रात्रभर विहिरीजवळ थांबावे लागते. इथे साप, विंचूचा दंश होण्याची भीती वाटते. मात्र, पाणी मिळवण्यासाठी दुसरा पर्यायच नसल्याचे महिला सांगतात.

### पाणीपुरवठा योजना ठप्प

बिबट्याच्या तावडीतून बहिणीची सुटका करणाऱ्या हाली बरफ हिच्यामुळे शहापूर तालुक्यातील नांदगाव चर्चेत आले. या गावातील रहिवाशांना पाणी मिळावे, यासाठी एक योजना राबविण्यात आली. या योजनेत सौरपंपाद्वारे बोअरवेल किंवा विहिरीतील पाणी नळाद्वारे पोहोचविण्यात आले होते. त्यासाठी घरांबाहेर सार्वजनिक नळ बसविण्यात आले आहेत. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून या नळांना पाणीच येत नसल्याचे चित्र आहे. अनेक गावांमध्ये या योजनेची अशीच स्थिती असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. सुसरवाडीमध्ये मात्र या सौरपंपाद्वारे विहिरीमध्ये पाणी सोडण्यात येते आणि त्यासाठी येथे विहिरीपर्यंत जलवाहिनी टाकण्यात आली आहे.

# गुंडगिरी मोडून सत्तेचा माज उतरवणार

## उद्धव यांची हितेंद्र ठाकूरांवर टीका



**नालासोपारा :** नालासोपारा पश्चिमेकडील वंडा परिसरातील बौद्धस्तुपाच्या लगतच असलेल्या मोकळ्या मैदानावर उद्धव ठाकरेंची राजेंद्र गावित यांच्या प्रचारासाठी व २९ गावांच्या मुद्यावर बोलण्यासाठी कृतज्ञता मेळाव्याचे शुक्रवारी आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात भाषण करताना उद्धव ठाकरे यांनी वसई मधील गुंडगिरी मोडून काढून सत्तेचा माज उतरविणार असल्याची भाषा विरोधंकाबाबत केली आहे. यावेळी व्यासपीठावर दीपक केसरकर, उमेदवार राजेंद्र गावित, एकनाथ शिंदे, विवेक पंडित, रवींद्र फाटकसह अनेक महायुतीचे अनेक नेतेमंडळी उपस्थित होते.

वसईमध्ये काही डॉक्टर, इंजिनिअर, वकील, साहित्यिक, शिक्षक आदींची व्यथा आणि समस्यां एकण्याकरिता भेट असल्यामुळे दोन तास उशीर झाल्याने दिलिगरी व्यक्त करत उद्धव ठाकरे यांनी भाषणाला सुरुवात केली. २५ वर्षे सत्ता भोगूनही वसईमधील सामान्य लोकांच्या व्यथा आणि समस्यां अजून पर्यंत का नाही सोडवल्या, २९ गावे वगळण्याचा प्रश्न किंवा त्या गावातील लोकांना मनपात सामील व्हायचे नसतानाही जबरदस्तीने मनपा त्यांच्यावर का लादता ? असे अनेक प्रश्न विरोधकांना विचारले आहे. भर उन्हात बसलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह बघून आनंदी झालो असून कार्यकर्ते विचाराने तापलेले असून उन्हाने नाही, गुंडगिरीने तापलेले आहे, लोकांची सहशीलता संपली असून ते तुम्हाला तुमची जागा दाखवून युतीचे उमेदवार राजेंद्र गावित यांना निवडून आणणार असे उद्धव ठाकरे म्हणाले. या परिसरातील गुंडगिरी मोडून काढणार, संपवून टाकणार पण हे अशी थेट टीका आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यावर केली. नाणार प्रकल्प नको म्हणून गावकऱ्यांनी माझी भेट घेतल्यावर शिवसेनाने नाणार प्रकल्पाविरोधात उभे राहून हा प्रकल्प होऊ दिला नाही व तो रद्द झाल्याचा आदेशही काढला आहे. तरी काही विरोधक अपप्रचार करत आहेत. विरोधी पक्ष सरकार ज्यांचे येते त्यांच्याकडे जाऊन पाया पडत माझ्यावरील असलेले गुन्हे व केसेस काढून टाकण्यासाठी स्वत: पाया पडतात. स्वत:ची कातडी त्यांनी आजपर्यंत वाचवली असून लोकांच्या समस्या आणि व्यथा सोडवल्या नसल्याचे ठाकरे म्हणाले.

# सोनसाखळी चोरीत महिलादेखील सक्रिय

## मीरा रोडमधील तीन प्रकरणात महिलेचा समावेश

**भाईंदर :** सोनसाखळी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये आतापर्यंत बेरोजगार अथवा व्यसनाधीन तरुणांचा सहभाग असल्याचे दिसून येत होते. परंतु मीरा रोड येथे घेडलेल्या सोनसाखळी चोरीच्या तीन प्रकरणात महिलादेखील सहभागी असल्याचे उघडकीस आले आहे.

मीरा रोडच्या पूनम गार्डन परिसरात रहाणाऱ्या जेस्सी या मुंबईत एका खासगी कंपनीत नोकरी करतात. रात्री नऊच्या सुमारास त्या कामावरून आपल्या घरी जात असताना राहत्या इमारतीजवळच त्यांच्या गळ्यातील सोनसाखळी एका काळ्या रंगाच्या दुचाकीवरील तरुणाने खेचून पळ काढला. यावेळी दुचाकीस्वारासोबत एक तरुणीदेखील असल्याची तक्रार जेस्सी यांनी मीरा रोड पोलिसांकडे केली आहे. यावेळी सोनसाखळी चोरीची तक्रार देण्यासाठी आणखी एक व्यक्ती पोलीस ठाण्यात आली होती. जेस्सी यांची सोनसाखळी चोरल्यानंतर अर्ध्या तासाच्या अंतराने मेरी गोल्ड परिसरात प्रभाकर भोईर यांच्या गळ्यातील सोनसाखळी चोरण्यात आली आणि या प्रकरणातही तोच दुचाकीस्वार आणि महिला असल्याचे पोलिसांना सांगण्यात आले.

या घटनेच्या काही दिवस आधी दीपक रुग्णालय परिसरात भाजी बाजारात गेलेल्या महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी खेचण्याचा प्रकार झाला. या घटनेतही काळ्या रंगाचीच दुचाकी होती आणि दुचाकीस्वारासोबत तोंडावर पांढऱ्या रंगाची ओढणी गुंडाळलेली महिला असल्याचे पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये आता महिलादेखील सहभागी होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# दीड लाख कोटींची बुलेट ट्रेन नको, त्यापेक्षा ३५ हजार कोटी खर्चून डहाणू ते विरार रेल्वे चौपदरी करा

**बोईसर :** डहाणू ते वैतरणा दरम्यानच्या लाखो प्रवाशांची उपनगरीय (लोकल ) सेवा ही जीवनदायी असून या मार्गावरील अनेक समस्या लोकसभेच्या अनेक निवडणुका आल्या व गेल्या तरी अजूनही कायम असून त्या लोकप्रतिनिधी व रेल्वे प्रशासनाकडून गांभीर्याने वेळच्या वेळी सोडविल्या न गेल्याने त्याचा प्रचंड मानसिक त्रास आज चाकरमनी, महिला व वयोवृद्ध, अपंग तसेच कामगार आणि सर्वसामान्य प्रवाशांना सहन करावा लागतो आहे. म्हणूनच पालघर जिल्ह्याला बुलेट ट्रेनची नव्हे तर वैतरणा ते डहाणू, विरार दरम्यानच्या लोकलसेवेच्या समस्या सोडविण्याची गरज आहे.

आता लोकसभेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत आजी - माजी खासदार (जे निवडणूक रिंगणात आहेत) त्याच बरोबर इतर ही उमेदवार आम्ही व आमच्या पक्षाने, संघटनेने डहाणू - विरार दरम्याच्या रेल्वे प्रवाशांचे काही सोडविलेल्या प्रश्नांबरोबरच आम्ही हि कामे केली ती कामे केली असे सांगून स्वत:ची पाठ थोपवून घेऊन मागील प्रलंबित असलेले प्रश्न आम्ही लवकरच सोडवू अशी (प्रत्येक निवडणुकीत देणारी) आश्वासन या वेळीही



नेहमीप्रमाणे पुन्हा देतील.

मागील अनेक निवडणुकीत मतदारांनी सर्वच पक्षांना संधी देऊनही रेल्वेचे प्रश्न का सुटले नाहीत. पूर्वी हा मतदार संघ डहाणू व उत्तर मुंबई या दोन मतदार संघात विभागला होता लोकसभेच्या निवडणुकीचा इतिहास पाहिला असता डहाणू मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार दामू शिंगडा पाच वेळा तर एक वेळा शंकर नम निवडून आले होते, दोन वेळा भाजपा -सेना युतीचे चिंतामण वनगा, तर एक वेळा माकपचे लहानु कोम यांना मतदारांनी संधी दिली होती तर उत्तर मुंबईतून पाच वेळा भाजपाचे राम नाईक एक वेळा काँग्रेसचे (परंतु बहुजन विकास आघाडीच्या हितेंद्र ठाकुरांनी पाठिंबा दिलेले) उमेदवार अभिनेते गोविंदा निवडून आले होते. २००९ साली लोकसभेचा पालघर हा (अनुसूचित जमाती करीता राखीव) मतदार संघ नव्याने निर्माण करण्यात आला, पुनर्रचनेनंतर प्रथम बहुजन विकास आघाडीचे बळीराम जाधव, २०१४ च्या निवडणुकीत भाजपचे चिंतामण वनगा व पोटनिवडणुकीत भाजपचेच राजेंद्र गावित निवडून आले होते. म्हणजेच आताच्या निवडणुकीतील जवळ जवळ सर्वच पक्षांना येथील भोळ्याभाबड्या मतदारांनी कधी सलग तर कधी आलटून पालटून संधी दिली होती. तरीही त्यातला एकही जण रेल्वेच्या या समस्या सोडवू शकलेला नाही.

# मॉडेलिंगसाठी इच्छुक तरुणीवर प्रियकरानेच केला बलात्कार, भाईंदरमधील घटना



**भाईंदर** - प्रियकरानेच अल्पवयीन प्रेयसीला मारहाण करुन तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना भाईंदरमध्ये घडली आहे. पीडित तरुणीला मॉडेल बनण्याची इच्छा होती. आरोपीने तिला चित्रपटात भूमिका मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. भाईंदरच्या नवघर पोलिसांनी या प्रकरणी आरोपी प्रियकर आणि त्याच्या मित्राला अटक केली आहे.

मॉडेल बनण्यासाठी आपला संघर्ष सुरु असताना दोघांबरोबर वर्षभरापूर्वी ओळख झाली. हिंदी चित्रपट आणि मालिकांमध्ये रोल मिळवून देण्याचे दोघांनी तिला आश्वासन दिल्याचे तिने तक्रारीत म्हटले आहे. पीडित मुलीचे दोघा आरोपींपैकी एका मुलाबरोबर प्रेमसंबंध होते. पण काही महिन्यात त्यांचे ब्रेकअप झाले. त्यानंतर दुसऱ्या आरोपीबरोबर तिचे प्रेमसंबंध जुळले.

मागच्या आठवडयात पीडित मुलीचा प्रियकर तिला भाईंदर येथील एक बीचवर घेऊन गेला. तिथे त्याने तिच्या सॉफ्ट ड्रींकमध्ये गुंगीचे औषध मिसळले व तिच्यावर बलात्कार केला. शुद्ध आली तेव्हा आपले लैंगिक शोषण झाल्याचे तिच्या लक्षात आले

# नाशिक गावाला दत्तक घेणारा बाप पळून गेला
## राज ठाकरेंचा मुख्यमंत्र्यांवर घणाघात

**नाशिक-** नाशिकमध्ये हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या सभेचं आयोजन करण्यात आलं आहे. या सभेमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांच्यावर जोरदार टीका केली आहे. यावेळीही राज ठाकरे यांनी मोदी आणि देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधातल्या व्हिडिओ क्लिप दाखवत त्यांच्यावर घणाघात केला.

नाशिक गावाला दत्तक घेणार बाप पळून गेला अशी जहरी टीका राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर केली. कांदा आणी कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न ८ दिवसात सोडवू अशी मुख्यमंत्र्यांची व्हिडिओ क्लिप राज ठाकरेंनी पडद्यावर दाखवली पण शेतकऱ्यांना कांदा मोफत वाटावा लागला, मुलीचं लग्न मोडलं, शेतकऱ्यांची स्वप्न उध्वस्त झाली हे गावचं सत्य असल्याचं राज ठाकरे म्हणाले.



'या सरकारच्या काळात राज्यात १४ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचं भांडवल करून भाजपानं सत्ता मिळवली होती.' असं राज ठाकरे म्हणाले.

यावेळी संजय धोत्रे, नितीन गडकरी, एकनाथ खडसे, राधा मोहन सिंग, रावसाहेब दानवे अशा अनेक नेत्यांची शेतकरी विरोधी वक्तव्य राज यांनी वाचून दाखवली.

'इरिगेशनचे ७० हजार कोटी गेले कुठे? खरंच झाला होता का भ्रष्टाचार? अजित पवार, सुनील तटकरे यांच्यावर कारवाई झाली का? हा घोटाळा खरंच झाला का नुसता बनाव होता? ' असे असंख्य प्रश्न यावेळी राज ठाकरे यांनी उपस्थित केले. त्यासंदर्भात बातम्या त्यांनी पडद्यावर दाखवल्या. यावेळी नाशिकसाठी भाजपने केलेल्या घोषणा आणि गावात मनसेनं केलेली विकास कामं याचे फोटो राज ठाकरे यांनी दाखवले.

# आधीच उल्हास, त्यात...

**भाईदर (अनंत आंगचेकर)-** मी १९५७ च्या लोकसभा निवडणुकीपासून आज २०१९ चीही लोकसभा निवडणूक पाहात आहे. पूर्वीच्या निवडणुका व मतदार याद्या आणि मतदान पावत्या हाताने लिहून देखील अद्ययावत असायच्या. त्यावेळी घरोघरी जाऊन प्रचार करण्यात येत असे. मतदार पावत्या निवडणुकी आधी किमान ४ दिवस मतदारांपर्यंत पोहोचविल्या जात असत. मतदान यंत्रणा सक्षम व कुशल असायची. आता डिजिटल जमाना आहे. प्रचार व मतदान यंत्रणा आता डिजिटल असतानाही मतदार याद्या सदोष असतात . नाव एकाचे फोटो दुसऱ्याचा असतो. आजच्या मतदानात तर कहरच झाला आहे. कित्येकांची नावेच नाहीत. ज्यांची नावे आहेत, ते तिथे रहात नाहीत. नवघर रोड येथील एका इमारतील ८०% मतदारांची नावेच नाहीत. ती नावे दुसऱ्याच इमारतीत आढळून आली. अनेक मतदारांना मतदान पत्रिका (स्लीपा) मिळाल्याच नाहीत. काही राहातात नवघर रोडला, त्यांना मतदान केंद्र अभिनव शाळेत. साईबाबा नगर मधील मतदारांना लोकमान्य शाळा किंवा एस. एन. कॉलेजमध्ये केंद्र आले. या कडक उन्हाळ्यात एवढया लांब कोण जाणार? कित्येकांची नावे आधीच्या यादीत होती; आजच्या यादीतून त्यांची नावे गायब झालेली आढळली. याउलट काहींची नावे दोन ते तीन वेळा छापण्यात आली आहेत. हीच का सुधारीत डिजिटल यंत्रणा? याचा नाहक मनस्ताप मतदारांना भोगायला लागत आहे. अशा तक्रारी यापूर्वीही आलेल्या आहेत. पुढील वेळी सुधाराणा करण्यात येईल असे आश्वासन देऊनही मागील पाढे पंचावन्न चालूच आहेत. यात सुधारणा होण्यासाठी मी काही वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र टाइम्स' या वर्तमानपत्रात लिहून अशी सूचना केली होती



की, दशवार्षिक जनगणना घरोघरी जाऊन करण्यात येते, तशी घरोघरी जाऊन मतदारांच्या नावांची गणना व यादी बनवावी. जेणेकरून मीरा-भाईंदर मध्ये दर महिन्यात रहिवाशी बदलत असतात. इथे भाडेकरुंची संख्या जास्त आहे. ते सतत बदलत असतात. जुने जाऊन नवे येत असतात. घराचा मूळ मालक इथले घर भाड्याने देऊन तो इतरत्र राहात असतो. मात्र त्याचे नाव इथेही असते आणि आता तो जिथे रहातो तिथेही असते. शिवाय त्या घरात आता जो भाडेकरु राहातो त्याचे नाव पूर्वी तो जिथे राहात होता तिथेही असते. यामुळे तीच तीच नावे पुन्हा पुन्हा आढळतात. हा घोटाळा दर निवडणुकीत होतच असतो. त्यावर उपाय म्हणजे मीरा-भाईदर मध्ये निवडणुकीआधी घरोघरी जाऊन मतदार नावे तपासून नवीन यादी अचूक व निदोष बनविणे होय.

# सीएसएमटीऐवजी वडाळा-पनवेल जलद हार्बर?

**वडाला -** दक्षिण मुंबईत होत असलेल्या मेट्रो आणि मोनो प्रकल्पांमुळे बहुचर्चित मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेलदरम्यानच्या जलद हार्बर उन्नत रेल्वेमार्गाचा आरंभबिंदू बदलण्याचा प्रस्ताव मुंबई रेल्वे विकास महामंडळाने तयार केला आहे. हा प्रस्ताव रेल्वे मंडळाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आला असून निवडणुकीनंतर त्यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. रेल्वे मंडळाची मंजुरी मिळाल्यास जलद हार्बरची सेवा वडाळा ते पनवेल यादरम्यानच चालवण्यात येईल.

मुंबई आणि आजूबाजूच्या शहरातील रेल्वे प्रवासी वाहतुकीचा विस्तार करण्यासाठी मार्च, २०१९ला एमआरव्हीसीने ५४ हजार कोटी रुपयांचा 'एमयूटीपी-३ ए' प्रकल्प मंजुरीसाठी केंद्रीय मंत्रिमंडळाकडे पाठवला होता. त्या वेळी फक्त ३३ हजार ६९० कोटी



रुपयांच्या प्रकल्पांनाच केंद्रीय मंत्रिमंडळाकडून मंजुरी देण्यात आली. मात्र, मुंबईत मेट्रो, मोनो, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रोड प्रकल्प होणार असून त्यामुळे सीएसएमटी ते पनवेल उन्नत जलद मार्ग प्रकल्पाची मुंबईकरांना कितपत गरज आहे, हे तपासून पाहण्याकरिता फेरआढावा घ्या, अशी सूचना करण्यात आली. त्यानुसार रेल्वे विकास महामंडळाने फेरआढावा घेऊन नवा प्रस्ताव रेल्वे मंडळाच्या मंजुरीसाठी पाठवला आहे.

यासंदर्भात एमआरव्हीसीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, नव्या प्रस्तावात उन्नत प्रकल्प सीएसएमटीऐवजी वडाळ्यापासून करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची किंमत १२ हजार ३३१ कोटी रुपये होती. नव्या प्रस्तावात ती दीड ते दोन हजार कोटी रुपयांनी कमी झाली आहे. भविष्यात दक्षिण मुंबईतील जनरल पोस्ट मुख्य कार्यालयापर्यंत (जीपीओ) मेट्रो जाणार आहे. त्यामुळे वडाळा ते सीएसएमटीपर्यंत रेल्वेला समांतर अशी मेट्रो होणार असल्याने उन्नत प्रकल्प वडाळ्यापासून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या प्रकल्पात इतर कोणतेही मोठे बदल करण्यात आलेले नाहीत. दरम्यान यापूर्वी पश्चिम रेल्वेवरही चर्चगेट ते विरार उन्नत मार्ग प्रकल्प होणार होता.

# महाराष्ट्रासह ८ राज्यांत दहशतवादी हल्ल्याची शक्यता; कर्नाटक पोलिसांकडून अॅलर्ट

**नवी दिल्ली (रामेश्वरी गाडगे)-** श्रीलंकेत इस्टर संडेला झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताच्या किनारी राज्यांमध्ये सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली



आहे. समुद्रमार्गे दहशतवादी या राज्यांमध्ये प्रवेश करण्याची शक्यता लक्षात घेता ही खबरदारी घेण्यात आली आहे. दरम्यान, कर्नाटक पोलिसांनी महाराष्ट्रासह ८ राज्यांना पत्र लिहून दहशतवादी हल्ल्याच्या शक्यतेची सूचना देत अॅलर्ट दिला आहे.

कर्नाटक पोलिसांच्या माहितीनुसार, त्यांना एका व्यक्तीने फोनवरुन सांगितले की, महाराष्ट्र, कर्नाटकसह इतर ६ राज्यांमध्ये हल्ला घडवून आणण्याचा कट रचला जात आहे. या माहितीनंतर कर्नाटकच्या पोलिसांनी महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगाणा, पुदुच्चेरी, गोवा या राज्यांच्या पोलीस प्रमुखांना पत्र लिहून अॅलर्ट राहण्यास सांगितले आहे. ज्या व्यक्तीने कर्नाटक पोलिसांना फोन केला त्याने स्वतः एक ट्रक ड्रायव्हर असल्याचे सांगितले आहे. स्वामी सुंदर मुर्ती असे स्वतःचे नाव सांगताना शुक्रवारी संध्याकाळी ५ वाजता बंगळुरू शहर पोलिसांच्या कन्ट्रोल रुमला त्याने फोन केला होता. यामध्ये त्याने सांगितले होते की, देशातील आठ राज्यांमध्ये दहशतवादी स्फोट घडवून आणण्याच्या तयारीत आहेत.

यावेळी दहशतवादी रेल्वे गाड्यांमध्ये स्फोट घडवून आणू शकतात असेही त्याने म्हटले आहे. तामिळनाडूच्या रानाथपुरम येथे १९ दहशतवादी असल्याचाही त्याने दावा केला आहे. या फोननंतर कर्नाटक पोलिसांनी सर्व संबंधीत राज्यांच्या पोलिसांना पत्र लिहून खबरदारी घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

दरम्यान, तामिळनाडूनच्या चेन्नई पोलिसांनाही एक फोन आला होता. यामध्ये रामेश्वरमधील प्रसिद्ध पंबन सी पुल उडवण्याची धमकी देण्यात आली होती. या फोन नंतर पोलिसांनी संबंधीत पुलावर बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाला पाचारण केले होते. तसेच इतर महत्वाच्या ठिकाणांनाही त्यांनी सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे.

# गावात पाणी येईना.. लग्नासाठी कुणी मुलगी देईना!

**सातारा -** नेर तालुक्यातील आजंती गावात जवळपास ४० तरुण विवाहोच्छुक आहेत. त्यातील ३८ तरुणांना मुलींच्या पालकांकडून नकार मिळाला. कारण काय? तर पाणीटंचाई. उर्वरित दोन तरुणांचे विवाह जुळले असले तरी त्यातील एक जण पुण्यात काम करत आहे. दुसऱ्याने तालुक्याच्या ठिकाणी संसार थाटण्याचा शब्द वधुपक्षाला दिला आहे. मात्र, दुष्काळझळांनी ३८ तरुणांची विवाहस्वप्ने होरपळून टाकली आहेत. लग्नानंतर जन्मभर आपल्या मुलीच्या डोईवर पाण्याचा हंडा घेऊन वणवण फिरण्याची वेळ येईल, या भीतीने पालकांनी आपली मुलगी देण्यास गावातील ३८ तरुणांना नकार दिला. 'लग्न झाल्यापासून डोक्यात पाण्याशिवाय कोणताच विचार आला नाही,' अशी मार्मिक प्रतिक्रिया निर्मला अरसोड या वृद्धेने दिली. आता मुले, सुना, नातवंडांची तरी या समस्येतून सुटका व्हावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. पाणीटंचाईमुळे तरुण शहरात स्थलांतरित होत आहेत. लग्न होत नसल्याने नेर तालुक्यातीलच चिकणी



डोमगा गावही भीषण पाणीटंचाईला सामोरे जात आहे. जिल्हा परिषदेत गावातीलच सदस्य असूनही तेथील पाणीटंचाई दूर झालेली नाही. जनावरांनाही पाणीटंचाईच्या झळा बसत आहेत. जिल्ह्यात सरासरीच्या जवळपास पर्जन्यमानाची नोंद असली तरी पावसाचे पाणी अडविण्यासाठी कुठलीच उपाययोजना नाही. परिणामी पाणी वाहून जाते आणि दर वर्षी पाणीटंचाई निर्माण होते. पाणीटंचाईमुळे पालकांना मुलींचे विवाह गावाऐवजी शहरात करावे लागतात. शहरात सभागृहापासून पाण्यापर्यंत सर्वच गोष्टींसाठी पाण्यासारखा खर्च होत असल्याने मुलींच्या पालकांचे पाय कर्जात रुततात, ही व्यथा आजंती येथील एका पालकाने सांगितली. खाकीनाथ मनकोजी महाराजांच्या मंदिरामुळे तीर्थक्षेत्राचा दर्जा असलेल्या आजंती गावाचा पाणीप्रश्न गेल्या ६० वर्षांपासून कायम आहे. सरकारच्या 'जलयुक्त शिवार' योजनेच्या जिल्ह्यातील पहिल्या कामाचे उद्घाटन आजंती गावात झाले.

# सुरक्षा रक्षकांना मोठे यश, चकमकीत 'आयएस'चे १५ दहशतवादी ठार



**कोलंबो -** श्रीलंकेत झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर इथल्या सुरक्षा रक्षकांनी देशाच्या पूर्व भागातील इस्लामिक स्टेटशी (आयएस) संबंधित ठिकाणांवर छापेमारी केली, यावेळी झालेल्या चकमकीत १५ दहशतवादी ठार झाले आहेत.

श्रीलंकेच्या लष्कराचे प्रवक्ते सुमित अटापटू यांनी शनिवारी सांगितले की, सुरक्षा रक्षकांनी जेव्हा कलमुनई शहरात बंदुकधाऱ्यांच्या ठिकाण्यांवर घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिथे लपलेल्या दहशतवाद्यांनी गोळीबार सुरु केला, त्यानंतर सुरक्षा रक्षकांनी त्यांना प्रत्युत्तर दिले. यामध्ये इस्लामिक स्टेटचे १५ दहशतवादी ठार झाले. या चकमकीत एक स्थानिक नागरिकालाही आपला जीव गमवावा लागला आहे.

# उष्णतेने महाराष्ट्र पुन्हा होरपळला!

**पुणे/नागपूर/अकोला- उष्णतेच्या लाटेने महाराष्ट्र पुन्हा एकदा होरपळून निघाला आहे. विदर्भाला सवाधिक झळ बसली असून मराठवाडा, खान्देश, उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र भाजून निघाला आहे. गुरुवारी राज्यातील सवाधिक तापमान विदर्भातील अकोला येथे ४६.३ अंश सेल्सिअस इतके नोंदविले गेले. रात्रीच्या किमान तापमानातही राज्यात सर्वत्र वाढ झाली आहे.**



पश्चिम मध्य प्रदेश, विदर्भात काही ठिकाणी तसेच ओडिशा, दक्षिण उत्तर प्रदेश, दक्षिण राजस्थान, पूर्व मध्य प्रदेश, उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि गुजरात येथे अनेक ठिकाणी उष्णतेची लाट आली आहे़ त्यात पुढील काही दिवसात वाढ होण्याची शक्यता असून उष्णतेची ही लाट पुढील तीन दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. राज्यातील प्रमुख शहरातील कमाल व किमान तापमान (अंश सेल्सिअस) : पुणे ४१०६ (२५०१), अहमदनगर ४३०४ (२३०६), जळगाव ४३ (२७०६), कोल्हापूर ४००७ (२६०१), महाबळेश्वर ३३०४ (२२०४), मालेगाव ४२०६ (२६०८), नाशिक ४००५ (२३०६), सांगली ४१०२(२३०९), सातारा ४००४(२६), सोलापूर ४२०८ (२७०२), मुंबई ३२०५ (२६०८), अलिबाग ३१०८(२५०५), रत्नागिरी ३३०६ (२५०८), पणजी ३४०४ (२५०६), उस्मानाबाद ४२०१, औरंगाबाद ४२०५ (२४०७), परभणी ४५ (२२०५), अमरावती ४००५(२३०२), बुलढाणा ४२०५ (२७०२), चंद्रपूर ४५०४ (२९), गोंदिया ३९०८ (२४०२), नागपूर ४४०३ (२७०४), वाशिम ४३०८ (२८), वर्धा ), यवतमाळ ४४०५ (२९०४) विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमधील तापमान प्रचंड वाढले असून हवमान विभागाने 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. पुढील तीन दिवस नागपूरसह विदर्भातील काही भागांमध्ये उष्ण हवेचे वारे वाहणार असून काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. जेव्हा तापमान सरासरीपेक्षा चार ते पाच डिग्री सेल्सिअसच्या वर जाते तेव्हा कडक उन आरोग्याला घातक ठरू शकते. अशा परिस्थितीमध्ये हवामान विभाग 'ऑरेंज अलर्ट' जारी करीत असतो.

# मीठ उत्पादन धोक्यात



**ठाणे- पालघर जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर मीठ उत्पादन करणाऱ्या संस्थांना शासकीय लाभांपासून वंचित ठेवण्यात आले आहे. बाजारात १२ ते २० रुपये किलो दराने मीठ विकले जात असताना मिठागरातील मिठाला जेमतेम सव्वा ते दीड रुपया दर मिळत आहे. तुटपुंजी कमाई आणि त्यात सरकारी उदासीन धोरण, यामुळे मिठागरांचा व्यवसाय धोक्यात आला आहे.**

पालघर जिल्ह्यातील सहकारी तत्त्वावर मिठाचे उत्पादन घेणारे केळवे मीठ उत्पादक सहकारी सोसायटी लिमिटेड ही सर्वात मोठी संस्था असून सुमारे ३४० एकर क्षेत्रफळावर या संस्थेतून वर्षाला साडेआठ ते नऊ हजार मेट्रिक टन मिठाचे उत्पादन केले जाते. या संस्थेकडे कायमस्वरूपी कामगार कार्यरत असून संस्थेला होणारा नफा हा या कामगारांमध्ये नियमितपणे वितरित केला जातो. समुद्रातलं पाणी मिठागरात घेऊन त्याला वेगवेगळ्या मिठाच्या कुंडांमध्ये साठवून त्या पाण्यामधील मिठाचे प्रमाण (डिग्री) वाढविण्यात येते. या पाण्याची २२ डिग्री इतकी प्राप्त झाल्यानंतर हे खारट पाणी मिठाची लादी बनविलेल्या कुंड्यांमध्ये सोडण्यात येते. त्यात नंतर आठवड्याभरात मीठ टप्प्याटप्प्यात तयार होते. केळवे येथील मिठागरात उत्पादन करताना मजुरी, विद्युत खर्च तसेच भराईसाठी सुमारे १२०० रुपये प्रति मेट्रिक टन उत्पादन खर्च येतो. केळवे येथील मिठागरात ठिकाणी सुमारे १०० कामगार कार्यरत असून येथील मिठाला १३०० ते १८०० रुपये मेट्रिक टन असा दर वर्षभरात मिळत असतो.


मीठ उत्पादन हे मत्स्य व्यवसाय किंवा शेतीशी समांतर अशी प्रक्रिया असून शेतकऱ्यांना ज्या दराने कृषिपंपाकरिता वीज उपलब्ध करून दिली जाते त्याच पद्धतीने सवलतीच्या दरात वीज उपलब्ध करून द्यावी, अशी येथील पदाधिकाऱ्यांची मागणी आहे. सध्या औद्योगिक वीजदराने केळवे येथील मिठागरात सुमारे १०० हॉर्सपॉवर इतक्या विजेची जोडणी असून वर्षाकाठी विद्युत बिलाचा खर्च सुमारे दहा लाख रुपये इतका येत असल्याची माहिती संस्थेचचे अध्यक्ष जगदीश घरत यांनी दिली. एकीकडे शेतकऱ्यांना सौरपंप घेण्यास ९० टक्के अनुदान दिले जात असताना सहकारी तत्त्वावर मीठ उत्पादन करणाऱ्या संस्थेला कोणत्याही प्रकारची सवलत वा अनुदान शासनाकडून दिले जात नसल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. अवेळी पडणारा पाऊस व इतर घटनांमुळे मीठ उत्पादन घेणे जिकिरीचे बनले आहे.

# बुलढाण्यात उष्माघात कक्ष कुलुप बंद!

**बुलडाणा -** विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिलेला असताना बुलडाण्यातही उन्हाचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. दरम्यान, २५ एप्रिल रोजी तर बुलडाण्यातील तापमान ४२.५ अंश सेल्सीअसपर्यंत गेलेले असतानाही जिल्हा सामान्य रुग्णालयातील उष्माघात कक्ष कुलुप बंद दिसून आले. उष्माघाताचा रुग्ण आल्यास या कक्षामध्ये सुविधांचाही अभाव असल्याचे वास्तव समोर आले आहे. विदर्भात २३ ते २९ एप्रिल या कालावधीत उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. भारतीय हवामान



खात्यानुसार विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. मध्यम ते उष्ण लहरी प्रवाहीत होत आहेत. परिणामी, बुलडाणा जिल्ह्याला लागून असलेल्या अकोल्याचेही तापमान ४६ अंशावर गेल्याने पूर्व विदर्भातील उष्णतेची लाट हळुहळु पश्चिम विदर्भातही शिरली आहे.




आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)